# ॥ कुळकर्णी व्हर्सेस देशपांडे ॥

-प्रल्हाद जाधव

या एकांकिकेतील पात्रे :

कुळकर्णी

आणि

देशपांडे

या एकांकिकेचा कोणत्याही माध्यमातील, कोणत्याही भाषेतील प्रयोगापूर्वी लेखकाची परवानगी घेणे बंधनकारक आहे.

(पडदा उघडतो. वेळ सकाळी अकराची. रंगमंचावर फर्निचर जवळजवळ नाहीच. एक टेबल, एक बाकडे आणि दोन खुर्च्या खूप झाल्या. बाकी सारे मायमिंगने दाखवायचे. ती पुस्तक वाचत बसली आहे. एका विंगेतून एक तरूण येतो व एक काल्पनिक दरवाजा न्याहाळत दारावरची बेल दाबतो.)

तो : (काल्पनिक बेल दाबत तोंडानेच) डिंग डाँग ऽऽ डिंग डाँग ऽऽ
(ती दुर्लक्ष करते)

तो : डिंग डाँग ऽऽऽ डिंग डाँग ऽऽ

ती : काय कटकट आहे मेली ! इतकं चांगलं पुस्तक वाचायला घेतलं आणि कोण कडमडलं मध्येच ? (पुस्तक घेऊन उठते)

तो : डिंग डाँग ऽऽऽ डिंग डाँग ऽऽऽ डिंग डाँग ऽऽऽ

ती : (दरवाजा उघडून त्याच्या अंगावर खेकसते) कोण हवंय आपल्याला ?

तो : (तिच्या हल्ल्यानं दचकत) अं...

ती : अहो, कोण पाहिजे तुम्हाला ? ऐकू येतं ना ? मेले कोण येतात एकेक कडमडायला कुणास ठाऊक. (त्याला संधीही न देता) हे बघा, आमच्या घरात कुणालाही मलेरिया झालेला नाही. किंवा आमच्या लाईटचं कनेक्शन दुरूस्त करायचं नाही किंवा आमचा नळही नादुरूस्त झालेला नाही, समजलं ?

तो : तुम्ही काय म्हणालात ते समजलं पण तुम्ही समजता त्यापैकी कोणीही नाही मी.

ती : मग नक्कीच साबण विकणारे किंवा अनाथाश्रमासाठी वर्गणी मागायला आलेले असणार... हे पहा इथं तुमची काहीही डाळ शिजणार नाही, समजलं ?

तो : समजलं, पण मी इथे काही डाळ वगैरे शिजवायला आलेलो नाही. नाही म्हटलं तरी इथे या पाचव्या मजल्यावर हवेचा दाब कमी असल्यामुळे डाळ शिजायला तसा थोडा उशीरच लागेल. काय ?

ती : हे बघा, मला सायन्स शिकवू नका. एका वाक्यात सांगून टाका तुम्ही कोण ? तुम्हाला कोण हवंय आणि कशासाठी ?

तो : देशपांडे इथंच राहतात का ?

ती : बोहर दरवाजावर पाटी लावलेली आहे. वाचता येतं ना तुम्हाला ?

तो : (वरची पाटी पहात) पाटी खूप जुनी झालीय. अक्षर लागत नाही. देशाचा पत्ता नाही फक्त पांडे शिल्लक राहिलेत. मग तुम्ही पांडे की देशपांडे ?

ती : देशपांडे ! काय काम होतं ?

तो : त्यांना एकुलती एक मुलगी आहे...

ती : मीच ती... पुढं ?

तो : मी तिला बघायला आलोय... !

ती : अय्या ! मला बघायला आलात ? मग हे आधी सांगायला काय धाड भरली होती? या आत या !

तो : थँक्यू. (पहात) वा फ्लॅट चांगला आहे तुमचा. म्हणजे अगदी स्वर्गात

आल्यासारखं वाटतं. नाहीतरी लिफ्टशिवाय पाच मजले चढून वर यायचं म्हणजे स्वर्गात आल्यातच जमा की ! (पाय दाबत) अया ई ई गं ऽऽऽ, लिफ्ट नेहमीच बंद असते वाटतं तुमची ?

ती : (लक्ष पुस्तकात) बंद असून काय फायदा ? तुमच्यासारखे उपटसुंभ यायचे ते येतातच !

तो : तुमचं स्पष्ट बोलणं आवडलं मला. कोणतं पुस्तक वाचताय ?

ती : (पुस्तकातच) स्पष्ट म्हणा, फटकळ म्हणा. पण एक सांगते. इतके पाच जिने चढून आलात म्हणून घटकाभर टेका आणि फुटा. मुलानं मुलीला पाहायला वगैरे येणं मला अजिबात मान्य नाही, समजलं ? (पुन्हा पुस्तकात)

तो : का बरं मान्य नाही ? त्यात काय गैर आहे ? अहो, उभ्या आयुष्याचा प्रवास जे एकमेकांच्या साथीनं करणार, त्यांनी लग्नापूर्वी एकमेकांना पाहायलासुद्धा नको ? आय मीन पूर्वी कधीही तोंड बघितलं नाही अशा माणसाबरोबर किंवा बाईबरोबर आयुष्य काढायचं ? काय ?

ती : (पुस्तकातून मान काढीत) मला काही म्हणालात ?

तो : तुमच्याशी नाहीतर काय हवेशी बोलतोय मी ? (ती पुन्हा पुस्तकात लक्ष घालते. त्याचे बोलणे सुरूच) अहो, मुलाला मुलगी दाखवायला नेणं किंवा मुलानं मुलगी बघायला जाणं ही अगदी नैसर्गिक आणि आवश्यक बाब आहे.

ती : (वाचनातली प्रतिक्रीया) वा ! क्या बात है !

तो : पटलं ना ! अहो, वाटलंच होतं मला. नाहीतरी कोणीतीही गोष्ट कुणालाही पटवून देणं हा अगदी माझ्या डाव्या हाताचा — (तिला पुस्तकात गर्क पाहून स्तंभित होतो आणि तिच्या जवळ जाऊन हात जोडत) अहो, देशपांडेबाई...

ती : (पहात ) अं ?

तो : तुमची इच्छा नसेल तर निघतो आम्ही..

ती : (आनंदून) अय्या ऽऽ, इतक्या लौकर फुटताय तुम्ही ? गॉड. ... यू आर रिअली ग्रेट. (हात आपटून नमस्कार करत. दरवाजाच्या दिशेने) चला !

तो : (जाता जाता) बाबांना आणि आईना सांगा, मी येऊन गेलो म्हणून...

ती : येस-येस, शुअर !

तो : 'येऊ मग' ?

ती : या ऽऽ

तो : म्हणजे 'मग येऊ? '

ती : हे पहा, तुम्ही पुन्हा इथे येण्याची अजिबात गरज नाही आणि एक लक्षात ठेवा — (तो कान पुढे करतो) तुमच्यासारख्या बावळट माणसाबरोबर लग्न करण्याऐवजी गळ्यात धोंड बांधून विहिरीत उडी मारीन मी, समजलं ?

तो : असली घाणेरडी पुस्तकं वाचणाऱ्या बाईला यापेक्षा अधिक चांगला विचार कसा बरं सुचेल ?

ती : आता तुम्हाला धक्के मारून बाहेर काढण्याची वेळ माझ्यावर येऊ देऊ नका. घाणेरडं म्हणे. बापजन्मात कधी बघितलं होतं का असलं पुस्तक ?

तो : (तावातावानेच) असंल घाणेरडं पुस्तक माझ्या बापानंही बघितलं नसेल कधी एवढं नक्की !

ती : हे पहा, मी तुम्हाला अखेरचं सांगते की हे पुस्तक घाणेरडं नाही. माझ्या अतिशय आवडत्या लेखकानं आपल्या कॉलेजमधील दिवसांच्या कडूगोड आठवणी मनाची पकड घेणाऱ्या शैलीत या पुस्तकात लिहिलेल्या आहेत. पुस्तकाचं नाव आहे 'फुलायचे दिवस'. समजलं ?

तो : 'फुलायचे दिवस'

ती : येस !

तो : म्हणजे वामन कुळकर्णींचं ?

ती : हो !

तो : आय ॲम व्हेरी सॉरी...मला आधी माहीत असतं तर या पुस्तकाला घाणेरडं म्हणायची माझी छाती झाली नसती...

ती : अग बाई ऽऽऽ, ते का बरं ?

तो : कारण या पुस्तकाचा लेखक वामन कुळकर्णी म्हणजे मीच.

ती : (अचंबित होऊन एकदम काव्यमय उत्स्फूर्त प्रतिक्रिया व्यक्त करते.) काऽऽय?
अहो, काय म्हणताय काय ?
अहो, हे सोन्यासाखरं पुस्तक
त्याचे तुम्हीच लेखक काय ?
कुणीतरी विश्वास ठेवील काय ?

तो : अहो हे माझंच पुस्तक !
हे माझंच पुस्तक !
माझंच पुस्तक असूनसुद्धा शंका कसली घेता,
आहे मी शब्दसृष्टीचा कर्ता !
शब्द शब्द अन् अक्षर अक्षर
काना-मात्रा वेलांटीही त्यातील माझीच हाय !

ती : काय म्हणताय काय ?
हे सोन्यासारखं पुस्तक
त्याचे तुम्हीच लेखक काय ?
कुणीतरी विश्वास ठेवी काय ?
अहो हे पुस्तक कसलं ? पुस्तक नाही,
हे तर फुलपाखरू सोनेरी रंगाचे
शब्द शब्द जणु यातील म्हणजे
ठिपके त्याच्या रंगीत पंखावरचे...
प्रतिभेचा हा स्पर्श आगळा

सरस्वतीची ही किमया
तुम्हासारख्या बावळट माणसा कसली साधाया ?
गिरणीमध्ये कापडाच्या वा चक्कीत पिठाच्या
तुम्ही तर करीत असाल काम.

तो : (किंचाळत) काय ?

ती : (अंगठा उलटा करून दाखवत) घेऊन आलात काय ? कुणीतरी विश्वास ठेवील काय ?

तो : अहो, तुमची शप्पत खरंच सांगतो
बोलणार नाही खोटं
रविवारच्या पुरवणीत मी पाट्या टाकून
करून खर्डेघाशी कधीही भरलं नाही
पोट
सरस्वतीची किमया किंवा स्पर्श म्हणा प्रतिभेचा
पण लिहायला मी बसल्यावरती
मास्टर माझ्या दुनियेचा !
मंतरलेल्या आयुष्यातील दिवस मजेने फुलण्याचे
अक्षर होऊन आले आणि पुस्तक झाले त्यांचे.
(चाल बदलून)
पण तुम्ही तर म्हणताय काय ?
संशय घेताय काय ?
चेष्टा करताय काय ?
काय खाली डोकं वरती पाय ?
एवढंही जर पटत नसेल तर
कव्हर काढूनी मलपृष्ठावर पहा जरा निरखून
त्या पानावर फोटोही मी टाकलाय छापून
हो —हो —टाकलाय छापून...

ती : (मलपृष्ठ पाहत) अय्या ऽऽ काय म्हणताय काय ? ते कुळकर्णी तुम्हीच ?

तो : अजून विश्वास बसला नाही ?

ती : आता बसला. (अतिथ्यपूर्वक) पण तुम्ही बसा ना !

तो : खरंच बसू ?

ती : इश्य ऽऽऽ
(तो बसतो)

ती : मी चहा टाकते. (गुणगुणत गॅस पेटवते. पातेलं ठेवते. पाणी ओतते. चहापूड टाकते. साखरेचा डबा उघडत नाही, म्हणून) अहो, प्लीज जरा हा साखरेचा डबा उघडून देता का ?

तो : हो देतो ना. गोड कामाला नाही कोण म्हणणार ?

ती : काय हो ?

तो : बोला.

ती : लोक लग्न कशासाठी करतात हो ?

तो : साखरेचा डबा उघडून देण्यासाठी ! (त्याचक्षणी डबा उघडतो. झाकण खाली पडल्याचा आवाज.)

ती : तुमचा हा मिष्कील स्वभाव तुमच्या पुस्तकात अगदी पानोपानी भरलेला आहे.

तो : त्याला माझा इलाज नाही. कारण कपाळावर आठ्या पाडून किंवा गाल फुगवून बसणं महणजे निसर्गानं माणसाला बहाल केलेल्या या दुर्मिळ आणि सुंदर जीवनाशी प्रतारणा करण्यासारखं आहे, असं मला वाटतं.

ती : नक्कीच !

तो : काय नक्कीच ?

ती : तुम्हीच ते कुळकर्णी !

तो : अहो, मी गंमत नाही करत. पण दुर्दैवाने ज्यांना आयुष्याची किंमत कळत नाही त्यांना लांबलचक आयुष्य मिळतं आणि ज्यांना आयुष्याची किंमत कळते त्यांना अल्पावधीतच इथला मुक्काम हलवावा लागतो. गोपाळ गणेश आगरकर वयाच्या 39 व्या वर्षी गेले. राम गणेश गडकरी वयाच्या 34 व्या वर्षी तर विष्णुशास्त्री चिपळूणकर 32 व्या वर्षी गेले. आणि मूर्तीमंत गतितत्व असलेला महाराष्ट्राचा लाडका बुलबुल त्र्यंबक बापूजी ठोमरे ऊर्फ बालकवी वयाच्या अवघ्या 28 व्या वर्षी गेले.

ती : अरेरे !

तो : माणसाचं काही सांगता येत नाही, आपलाही नंबर त्यात कोणत्याही क्षणी लागू शकतो. म्हणून जरा हसावं, खेळावं, लाईफ मस्तपैकी एन्जॉय करावं काय ?

ती : उन पडल्यावर धुकं जसं वितळून जातं ना, तसाच तुमच्या विषयीच्या माझ्या मनातला गैरसमज आता अगदी पार वितळून गेला.

तो : खरंच गेला ना ?

ती : गेला-गेला-गेला-

तो : तिकडे चहा उतू गेला बघा !

ती : (तिकडे निघत) अहो दोन मिनिटं झाली नाहीत अजून ठेवून, तर उतू कसा काय जाईल ?

तो : अहो, नाटकातला चहा असा लवकरच उतू जावा लागतो.

ती : (आणत) ठीक आहे मग घ्या ! तयारसुद्धा झाला. (ती आणि ती चहाचे घुटके घेत एकमेकांकडे पहात राहतात.)

तो : कसला विचार करताय ?

ती : फार ड्रॅमॅटिक सिच्युएशन आहे, नाही ?

तो : कसली ?

ती : मुलगा मुलीला बघायला घरी येतो आणि घरात कुणीच नाही !

तो : त्यात कसली आलेय ड्रॅमॅटिक सिच्युएशन !

ती : का ?

तो : कारण तुमचे आई-बाबा घराबाहेर पडले हे बघितल्यानंतरच मी घरात आलोय!

ती : तुमच्यासारख्या एवढ्या उमद्या माणसानं असला पाजीपणा करण्याचं कारण काय ?

तो : कारण एकच की मुलानं मुलीला किंवा मुलीनं मुलाला चारचौघांच्या देखत 'बघायचं' या गोष्टीला माझा अगदी सक्त विरोध आहे. ज्यांना परस्परांशी लग्न करायचं त्यांनीच एकमेकांना बघण्याची, मनमोकळेपणानं बोलण्याची गरज असते. आयुष्यभराचा साथीदार निवडायचा तर आधी परस्परांचा परिचय व्हायला हवा. आवडी-निवडी समजायला हव्यात. मतं जुळायला हवीत, मुख्य म्हणजे मनं जुळायला हवीत आणि म्हणून मी एकाटाच आधी भेटायला आलो तुम्हाला. नाही तर मग – (संगीत)

(काय झाले असते ते दोघेही करून दाखवतात)

तो : (आता मुलीचा बाप झालेला. मुलाकडचे लोक मुलीला बघायला आले आहेत.) या-या-या नमस्कार ! या या बाईसाहेब या. बसा-बसा ! (मुलाला) आपण असे इकडे आरामशीर बसा. वा-वा नको कसं ? आपण एवढे मोठे डॉक्टर. एम.डी. आमची मुलगी बीएस्सी. आपली बडदास्त ठेवणं हे आमचं काम नाही का ? काहीही संकोच करू नका. आपलंच घर समजा. (आत) अहोऽऽ ऐकलंत का...मुलीला आणा बरं... (ती डोक्यावर पदर घेऊन हातात चहाचा ट्रे घेऊन येते. तो सर्वांना चहा देतो व मुलाच्या जागी स्वत: बसत तिला) तुम्ही बसा ना, उभ्या का ? (ती बसते) नाव काय तुमचं ?

ती : विजया !

तो : गुड. इट्स अ चार्मिंग नेम, शिक्षण किती झालं तुमचं ?

ती : बीएस्सी. (खेकसत) बाबांनी सांगितलं ना मघाशी !

तो : ओके-ओके ! नो प्रॉब्लेम ! नोकरीला लागून किती वर्ष झाली ?

ती : दोन.

तो : वय किती ?

ती : एकवीस !

तो : (स्वत:शी हिशेब करत) ! एकवीस वजा एकोणीस-वजा-पंधरा-चार. म्हणजे वयाच्या चवथ्या वर्षी तुम्ही पाहिलीत गेलात-पण चवथ्या वर्षी तर पहिलीत ॲडमिशन मिळत नाही. (ती रागानं बघते) मग हे दोन वर्षाचं गणित कसं काय सोडवायचं बुवा ! हॅ...हॅ...हॅ. नाही म्हणजे गंमत म्हणून विचारतो हं...

ती : गणित अगदी सोपं आहे. मी सहाव्या वर्षीच शाळेत गेले.

तो : अस्सं... मग एकोणीसाव्या वर्षी बी.एस्सी. कशा काय झालात ?

ती : कारण मी डायरेक्ट तिसरीत ॲडमिशन घेतली होती.

तो : ॲ ? असं...असं... ओके... इट्स पॉसिबल ! ओ.के. ! शिवण-टिपण, विणकाम, भरतकाम, चहा, जेवण करता येतं ? कपडे धुता येतात, इस्त्री करता येते, फरशी पुसता येते, आल्या-गेल्याचं स्वागत करता येते, सासूचे पाय चेपता येतात. सासरची बोलणी खाता येतात, अपमान गिळता येतो ?

ती : आम्हा बायकांना हे सारं काही पिढ्यान् पिढ्या उपजतच येत असतं.

तो : ओ, दॅटस् वंडरफूल ! आता थोडं जनरल-नॉलेजसंबंधी विचारतो. आय मीन एकच प्रश्न विचारतो. आपले राष्ट्रपती कोणत्या ब्लेडनं दाडी करतात ?

ती : (चवताळून उठत) ब्लेडनी नाही कोयत्यानी करतात !

तो : (बाबांना) बाबा-मुलगी जरा जास्तच बोल्ड वाटतेय. बट एनी वे, (तिला) आता तुम्हाला काय विचारायचं असलं तर विचारा !

ती : लाईट गेल्यावर फ्यूज बदलता येतो ?

तो : नाही.

ती गॅस पेटवता येतो ?

तो : नाही.

ती : अंघोळीला पाणी काढता येतं ?

तो : नाही.

ती : किराणाची यादी करता येते ?

तो : नाही.

ती : कांदा कापता येतो ?

तो : नाही.

ती : दूध तापवता येतं ?

तो : नाही.

ती : बुटांना पॉलिश करता येतं ?

तो : नाही.

ती : शर्टचं बटन लावता येतं ?

तो : नाही.

ती : घड्याळ्याचा गजर लावता येतो ?

तो : नाही.

ती : पहाटे पाचला उठता येतं ?

तो : नाही.

ती : मुलांना खेळवता येतं ?

तो : नाही.

ती : त्यांचा हागमूत काढता येतो ?

तो : नाही.

ती : मग माणसाच्या जन्माला येण्याऐवजी पशूच्या जन्माला का नाही गेलात ?

तो : (चिडत) सी-यू आर क्रॉसिंग युवर लिमिट्स.

ती : यू हॅव ऑलरेडी गॉन बियॉन्ड द लिमिट्स, नाऊ प्लीज कीप युवर माउथ शट ॲन्ड गेट आऊट.

तो : बट्...

ती : आय डोन्ट वॉन्ट युवर बट्स ॲन्ड इफ्स. इमिजिएटली क्वीट द होम ॲन्ड डोन्ट कंपेल मी टू किक यू. (आक्रमक) गेट आऊट यू...!

तो : अहो पण...

ती : तुम्हाला शरम नाही वाटत राष्ट्रपती कोणत्या ब्लेडनं दाढी करतात हे विचारायला? बाई म्हणजे संसाराच्या रौरव नरकात वळवळणारा अडाणी जंतू वाटतो तुम्हा पुरूषांना. माजघरात सडत राहून वंश वाढवत राहायचं एवढंच काम करण्याच्या ती लायकीची ! तुमच्यासारखे तथाकथित बुद्धिवादी एकविसाव्या शतकाकडं जातानाही तिला बुरख्यात ठेवण्याची जी काळजी घेतात ती पाहून 'कसं होणार या देशाचं' एवढाच विचार मनात येतो. आय हेट यू-आय हेट यू !

तो : ('तो' म्हणजे कुळकर्णी टाळया वाजवत) वंडरफूल...

ती : वंडरफूल गेलं चुलीत. तुम्ही आधी बाहेर व्हा.

तो : अहो, पण मी...

ती : तुम्ही एमडी असाल तर आपल्या घरचे. हल्ली काय मुख्यमंत्र्यांची मुलंसुद्धा एम.डी. होतात !

तो : (डोक्याला हात लावत) अहो, मी तो एम.डी.डॉक्टर नाही. मी 'मी' आहे. म्हणजे मी लेखक—'फुलायचे दिवस' या तुम्हाला अतिशय आवडलेल्या पुस्तकाचा लेखक वामन कुळकर्णी !

ती : (भानावर येत) ओ—आयॅम सॉरी !

तो : (छातीवर हात ठेवत) बापरे !

ती : काहो, काय झालं ?

तो : छातीत धडधड व्हायला लागलीय.

ती : (ठसक्यात) आत्ता गं बया ऽऽऽ

तो : धड धड धड करी काळीज माझं पोरी
तुझ्या नजरेची सुरी पार उरामंदी
उरामंदी गेली सुरी आरपार पोरी तरी
तोरा तुझा न्यारा कसा वाघापरी |

अग तू बाजिंदी नार
झालो झटक्यात ठार

सारा देह थंडगार पडे खरोखरी |
मिठी तुझी ऊबदार
घालुनिया मला तार
तवातरी येईन म्या शुद्धीवरी |

ती : अरे हट् ! (असे म्हणून ती त्याला एक लाडिक चापट मारते आणि तो बेशुद्ध झाल्यासारखा बाकड्यावर पडतो. ती त्याच्याजवळ जाते. क्षणभर पाहाते आणि प्रेमळपणे ओवीच्या चालीवर गात)

ती : आज पहाटेच्या पारी
कसं सपान पडिलं
माझ्या केसामंदी फुलं
कोन्या राजानं माळीलं

माझे आई तुळशी गं ऽऽ
तुझी करिते मी पूजा
आला डोंगराच्यावरी
सूर्यनारायण राजा

माझ्या अंगणात आज
कोण घालतो ग पिंगा...

तो : (उठत) पिंगा ?

ती : माझ्या अंगणात आज
कोण घालतो ग पिंगा...

तो : पिंगा ग पोरी पिंगा गं पोरी पिंगा ऽऽ
पिंगा ग पोरी पिंगा ग पोरी पिंगा ऽऽ

दोघेही : पिंगा ग पोरी पिंगा ग पोरी पिंगा ऽऽ

ती : पोर एकुलती, आई-बापाची
मोठ्या लाडाची पोरी पिंगा...

तो : लेक थोरला, मोठा बंगला
गाडी गॅरेजला पोरी पिंगा...

ती : पोर देखणी, मोठी लक्षणी
शिकूनी शहाणी पोरी पिंगा...

तो : माझं लेखन, झाले वाचून
कित्ती हैराण पोरी पिंगा...

ती : मला बघायला, लागेल लाईन
होतील हैराण, पोरी पिंगा...

तो : तुला बघायला, पोरं येतील
हुंडा मागतीलं पोरी हुंडा...

ती : हुंडा ? (घायाळ होत खाली बसते.)

तो : (भोवती फिरत)
हुंडा ग पोरी हुंडा ग पोरी हुंडा ग पोरी हुंडा
हुंडा ग पोरी हुंडा ग पोरी हुंडा ग पोरी हुंडा
(हसत हसत तिच्यामागे दिमाखात उभा राहातो. ती जणू पराजित झालेली. तिचा मोठा हुंदका. ती रडतेय हे पाहून तो अस्वस्थ)

तो : अरे-अरे-अरे, असं रडायला काय झालं एकदम ?
(ती रडतेच आहे.)

तो : प्लीज रडू नका. असं काय झालं एकाएकी रडायला ?

ती : तुम्ही आलात तसे निघून जा येथून...प्लीज...

तो : अहो, पण का ?

ती : कारण तुम्ही याच व्यवस्थेतले एक पुरूष आहात. मुलगी ही बाजारात विकायची वस्तू आहे, असं तुम्हालाही वाटतं. तुम्ही पैसे मागाल. हुंडा घ्याल. आणि हुंडा देण्यासारखी आमची परिस्थिती नाही. (हुंदका)

तो : च् च् च् च्. अहो मला तसं म्हणायचं नव्हतं. उगाच आपलं काहीतरी ट ला ट जुळवीत होतो.

ती : माहिताय. तुम्हीसुद्धा शेवटी लेखकच. शब्दांचं मायाजाळ निर्माण करणं हा तुमच्या डाव्या हाताचा खेळ. पण त्यात मी अडकणार नाही. फांदीवर विश्रांती घेणारा पक्षी काळी काळानं पंखावर आभाळ तोलीत सप्‌कन निघून जातो, पण तो उडून गेल्यानंतरची त्या फांदीची थरथर मात्र कधीच त्याच्यापर्यंत पोहोचत नाही. तुमच्यातला कलावंत हेच करील. त्यापेक्षा नकोच ते गुंतणं...नको ती नाती जोडणं...प्लीज जा तुम्ही. मला काहीही ऐकायचं नाही तुमचं...

तो : मी तर जाणारच आहे. पण आलोय ते तुझा निर्णय ऐकण्यासाठी. लक्षात ठेव, मला तुझ्याकडून काहीही अपेक्षा नाही. आभाळाला जसे ढग हवे असतात किंवा झाडांना पक्षी, तशी तू मला हवी आहेस. तुझ्या स्थळाविषयीची चर्चा गेले काही महिने आमच्या घरात सुरू होती आणि म्हणून तुझी थोडीफार माहिती काढून तुला भेटायला आलो. मला तू आवडलीस हे जितकं सत्य आहे, त्याचप्रमाणे आमच्या घरातलं कोणीही माझ्या शब्दाबाहेर नाही, हेही सत्य आहे, आता निर्णय तुझा आहे. विचार कर ; त्यासाठी काही दिवसांचा विरह सहन करण्याची तयारी आहे माझी. तुझा निर्णय होईपर्यंत तळहातावर काळीज घेऊन वाट बघेन मी तुझी. (हाताची ओंजळ तिच्यापुढे धरतो.)
(ती हळूहळू पुढं येते. त्याचे तळहात आपल्या हातात घेऊन आत निरखून पहाते आणि नंतर खालून एक चापट मारते. त्याबरोबर त्याचं काळीज जणू आभाळात उडून जातं. त्याकडे पाहात)

तो : अरे अरे अरे अरे अरे...अहो, माझं काळीज, माझं काळीज...

ती : प्रेम करायचं असलं तर
काळीज काढून, जांभळाच्या झाडावरती
टांगून ठेवायचं असतं.
तो : अहो, भलतंच काहीतरी काय सांगताय ?
ती : प्रेम करायचं असलं तर
काळीज काढून. जांभळाच्या झाडावरती
टांगून ठेवायचं असतं.
तो : अहो, पण का ?
ती : तुम्हाला ती गोष्ट माहीत नाही का ?
तो : कसली ?
ती : सुसरीची आणि माकडाची !
तो : नाही बुवा !
ती : मग ऐका ऽऽऽ
गरीब बिच्चारं एक माकड,
रहात होतं नदीच्या काठावरती.
त्या काळावर जांभळाची
खूप-खूप-खूपच झाडं होती...
छोटी जांभळं-मोठी जांभळं,
टपोरी जांभळं-चवदार जांभळं,
इकडे-तिकडे जांभळंच जांभळं लटकत होती.
पण...
तो : पण काय ?
ती : एक माकड सोडलं तर खायला नव्हतं कोणी
वरती मोठ्ठ आभाळ आणि खाली खोल खोल पाणी...
तो : आवाज फार छान आहे तुमचा, अगदी मस्त !
ती : प्रेम करायचं असलं तर
काळीज काढून, जांभळाच्या झाडावरती
टांगून ठेवायचं असतं.
तो : पुढं काय होतं सांगा की ?
ती : त्या पाण्यामध्ये रहात होती
एक सुसर भली मोट्ठी ऽऽऽ
तो : बापरे (उड्या मारत पळतो)
ती : एके दिवशी सुसरताई पाण्यावरती आली
झाडावरती माकड बघून त्याला काय म्हणाली ?
तो : काय म्हणाली ?

ती : (सुसर) ए मिस्टर ऽऽऽ

तो : (माकड) काय ?

ती : ह्या झाडावरची जांभळं गोड असतील ना ?

तो : हो तर...खूपच गोड.

ती : पण याहीपेक्षा अगदी खडीसाखरेसारखी गोड जांभळं तुला हवीत का ? पलिकडच्या किनाऱ्यावर आहेत. सांग हवीयत का तुला ?

तो : हो ऽऽऽ मी पण खातो आणि तुलाही देतो...

ती : मग चल पलिकडे !

तो : पण मला तर पोहता येत नाही.

ती : माझ्या पाठीवर बैस. मी नेते तुला पलिकडे.

तो : वा, व्हेरी व्हेरी इन्टरेस्टिंग, पुढं काय होतं ?

ती : गरीब बिचारं माकड बसलं
पाठीवरती सुसरीच्या
सुसर म्हणाली त्याला आणून
मध्यावरती त्या नदीच्या —

तो : काय म्हणाली ?

ती : (सुसर) माकडा रे माकडा, आता मी तुला नदीत बुडवून ठार मारणार !

तो : (माकड) बापरे ! मला ठार मारणार, पण का ?

ती : मी तुला ठार मारणार.

तो : (रडत) मला तर पोहताही येत नाही. आता काय होणार माझं ? (लाडीगोडी लावत) सुसरताई, सुसरताई, तुझी पाठ किती मऊ !

ती : मस्का मारून काहीही फायदा नाही. मी तुला मारणार म्हणजे मारणार.

तो : पण का ? तुला तिकडच्या काठावरची गोड गोड जांभळं हवीत ना ? मी काढून देतो तुला.

ती : तिकडच्या काठावरती जांभळं-बिंबळ काहीच नाहीत. हॅ-हॅ-हॅ ऽऽऽ

तो : मग मला कशाला फसवलंस ?

ती : अरे गाढवा ! मला एकही जांभूळ खायला मिळत नाही. इतकी छान-छान, गोड-गोड जांभळं तू रोज खातोस. इतकी गोड-गोड जांभळं खाऊन तुझं काळीज किती गोड झालं असेल ? म्हणून मी तुला मारणार आणि तुझं गोड गोड काळीज खाणार...
(तो क्षणभर विचार करून एकदम मुत्सद्दीपणे हसायला लागतो.)

ती : हसायला काय झालं ?

तो : अहो सुसरताई, तुम्ही किनई अगदी वेड्या आहात. तुम्हाला जर माझं काळीज हवं होतं तर आधीच का नाही सांगितलं. देऊन टाकलं असतं मी तुम्हाला.

ती : म्हणजे ?

तो : अहो, आम्ही माकडं काळीज काढून झाडावर टांगून ठेवत असतो...

ती : अगंबाई, खरं की काय ?

तो : नाहीतर काय मग ? चल आता पुन्हा तिकडच्या काठाला...

ती : मग काय झालं माहिताय ?

तो : काय झालं ?

ती : आणि मग त्या मूर्ख सुसरीनं त्याला काळजाच्या आशेनं पुन्हा अलिकडच्या काठावर आणून सोडलं...

ती : संपली गोष्ट ?

ती : हो. आवडली ना ?

तो : आवडली. प्रेम करायचं असलं तर काळीज काढून जांभळाच्या झाडावरती टांगून ठेवायचं असतं हेही पटलं. कारण प्रेम म्हणजे मोह आणि मोह म्हणजे विनाश. मोहाची मायावी सुसर स्वप्नांचा एक भ्रामक पिंजरा ठेवते तुमच्यासमोर आणि त्यात अडकल्यानंतर तुमचं अस्तित्व म्हणून उरते ती केवळ अस्वस्थ खुडबुड, आणि ओल्या पिंपात माना मुरगळल्या शिवाय मरून पडणाऱ्या उंदराचा कुबट वास...

ती : म्हणून म्हणते की दोघांनी मिळून नवीन आयुष्याची सुरूवात करायची असेल तर धगधगत्या वास्तवाची जाणीव प्रथम ठेवायला हवी. हाताला चटके बसतील तेव्हा भाकरी मिळेल, हेच ते वास्तव. ते स्वीकारायची तुमची तयारी असेल तरच तुम्ही माझा हात हातात घ्या. (तो स्लो मोशनने तिच्याकडे यायला निघतो. पार्श्वभूमीवर ‘झिल मिल सितारोंका आंगन होगा’ हे अख्ख गाणं मंद सुरात वाजायला लागतं. त्याच्या पार्श्वभूमीवर भावी आयुष्यातील विविध प्रसंगाचे पुढीलप्रमाणे मायमिंग सुरू होते.)

1 रजिस्टर्ड मॅरेज

ती : (प्रतिज्ञा वाचते) मी कुमारी माधुरी देशपांडे, श्रीयुत वामन कुळकर्णी यांचा पती म्हणून स्वीकार करीत आहे. (ती करारावर सही करते. दोघेही प्रफुल्लित. हातात हात घालून वळतात.)

2 चौपाटीवर फिरायला

तो : काय भन्नाट वारा सुटलाय...हाय समुद्र बघितला ना की अगदी नादवून जातो मी. भेळ हवी का तुला ? ए भेळवाला ऽऽऽ, जरा रूकना. (धावत जाऊन भेळ आणतो. तिच्या हातात देतो.)

3 पिक्चरला

(दोघेही प्रेक्षकांकडे तोंड करून पिक्चर बघताहेत. ती त्याच्या खांद्यावर मान ठेवून झोपते. थोड्या वेळाने)

तो : (तिला हलवीत) उठ. अग उठ, पिक्चर संपला...

(ती आळस देते, नंतर ताड्कन उठत.)

ती : याद राखून ठेवा परत जरा मला हिंदी पिक्चरला आणलंत तर...

तो : (उठत) अग पण...

4 घरातली सकाळ

(तो फसाफसा साबण लावून दाढी करतो. ती जेवण करतेय. फटाफट अंघोळ करून, कपडे करून तो बाहेर येतो. जेवणाचे ताट तयार असते. तो जेवायला बसतो. पहिला घास उचलून खाणार एवढ्यात तिलाच भरवतो. तीही पहिला घास उचलून त्याला भरवते. तो तिचा हात तसाच आपल्या हातात धरून विचारतो.)

तो : ए ऽऽऽ

ती : काय ?

तो : आज ऑफिसला दांडी मारू ? (ती कपाळावर हात मारून घेते.)

5 भांडण

(तो पेपर वाचतोय. ती बादलीतले कपडे पिळून दोरीवर टाकतेय. बाळाच्या रडण्याचा आवाज वाढत जातो. ती संतापाने त्याच्याकडे पाहाते. तो मुद्दाम दुर्लक्ष करतो.)

ती : कानाची भोकं झाली की काय तुमच्या ? अहो, पोरगं रडतंय त्याला घ्या जरा. सगळे बापाचे गुण घेतलेत मेल्यानं. तुमचं सगळं घराणंच असलं !

(तो उठून तिला लोटांगण घालतो.)

6 कडाक्याचे भांडण

(बाहेरून येतो. तिच्याकडे जळजळीत नजरेने पहात)

तो : इकडं ये.

ती : काय ?

तो : इकडं ये. तुला ऐकू आलं की नाही ? (ती जवळ येते. तिच्या डोळ्यात रोखून पहात) त्या पलिकडच्या चाळीतल्या जोशाकडं कशाला गेली होतीस ?

ती : मला कुणाच्या बापाची भीती नाही. मी वाट्टेल तिथं जाईन.

(तो पटकन तिच्या श्रीमुखात देतो. क्षणभर अंधार. उजेड. आता दोघेही म्हातारी झालेली, तो आजारी. खोकतोय.)

ती : (थरथरत) अहो, ऐकलंत का...त्यात मेला एवढा काय संताप करून घ्यायचा ? पोरं पत्रं पाठवत नाहीत, नको पाठवू दे मेल्यांना. अहो, त्यांना पत्र पाठवायला वेळ मिळत नसेल. पंख फुटल्यावर पाखरं उडून जायची, ऱ्हातात थोडीच ? इतकी लहानाची मोठी केली. तळाहातावरच्या फोडासारखी जपली. ह्या हातांनी केलं त्यांचं सारं...पण आता आई-बापाला विसरली. (डोळ्याला पदर लावते.)

तो : (उठत) तुला किती वेळा सांगितलं की डोळ्यात पाणी आणू नको म्हणून. तुझ्या डोळ्यात पाणी बघितलं की माझा संताप होतो. अगं हे असंच असतं. आपण समजू की, आपल्याला मुलं झालीच नाहीत. आपण आई-बाप झालोच नाही.

(तिचा जोरदार हुंदका. त्यामुळे तो घायाळ होतो.) अगं, आता आपल्या आयुष्यातले किती क्षण बाकी राहिले ? बघ...बघ...मी म्हणालो ना आत्ताच तुला...तो बघ प्रत्यक्ष विठ्ठलच आपल्याला न्यायला आला...(दोघेही लटलटत 'त्या' विठ्ठलाकडे जाण्यासाठी पुढे असलेल्या अदृश्य देवळाच्या दिशेने सरकतात. तो 'विठ्ठला, परमेश्वरा' इ. असहाय उद्‌गार काढतो. वर हात करून देवळातली घंटा वाजवतो. घंटा वाजल्याचा आवाज. नंतर तीही घंटा वाजवते, त्यानंतर दोघेही खाली वाकून विठ्ठलाचे दर्शन घेतात व वरती उठता उठता कंपीत सुरात 'या विठूचा गजर हरिनामाचा झेंडा रोविला.' हा अभंग म्हणायला सुरूवात करतात. वरती उठता उठता त्यांचे सूरही तरूण होत जातात. अखेरीस एकदम खड्या आवाजात 'या संतांचा, या भक्तांचा मेळा गोपाळांचा डाव मांडिलाऽऽऽ या विठूचा गजर हरिनामाचा झेंडा रोविला' असा अभंग टिपेला नेत ते प्रेक्षकांना अभिवादन करतात. हळूहळू पडदा.)

*****